3683

जा.क्र.मसंकें/प्रअवा/S४५/२०१९
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली,
ता.दापोली,जि.रत्नागिरी.
दिनांक :– १५/११/२०१९

15 NOV 2019

प्रति,

मा.व्यवस्थापक,
कृषीज्ञान व्यवस्थापन कक्ष,
डॉ.बा.सा.को.कृषि विद्यापीठ दापोली,
ता.दापोली, जि.रत्नागिरी.

विषय:– विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीस देणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयान्वये मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत कार्यरत असणाऱ्या सर्व विभागांच्या प्रक्षेत्रावरील काजु लागवडीमधुन दरवर्षी उत्पादित होणारी काजु बी ग्रेडवाईज विक्री करून विभागांचे महसुली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने काजु बी ग्रेडींग करणेसाठी काजु बी ग्रेडींग मशीन खरेदी करावयाची आहे. त्या खरेदीचा तपशिल आणि अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशिल | एकुण नग |
|---|---|---|
| १) | काजु बी ग्रेडींग मशिन ८ फुटी ३ स्टेज (M.S / S.S)<br>काजु बी वे–४ व वे–७ निवड होणेसाठी | ०१ नग |

**अटी व शर्ती**

१. बंद लखोटयातील दरपत्रके दि. 31/12/2019 पर्यंत मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली कार्यालयात पोहोच होणे आवश्यक.
२. बंद लखोटयावर काजु बी ग्रेडींग मशिन पूरवठयाचे दरपत्रक असा उल्लेख करणे.
३. विहीत मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. 4/12/2019 रोजी या कार्यालयात उघडण्यात येतील.
४. टपाल खात्याचे विलंबास, हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
५. दरपत्रकामध्ये पुरवठादाराने GST क्र. नमुद करणे आवश्यक.
६. GST क्र. लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्र. असलेले पुरवठादाराचे लेटरहेड वरील दरपत्रक आवश्यक, सोबत PAN CARD प्रत जोडणे आवश्यक.
७. अधिकृत विक्रेते अथवा उत्पादक असल्यास तसे प्रमाणपत्र जोडावे, तसेच संबंधित कंपनीची अधिकृत दरसुची जोडावी.
८. दरपत्रकामध्ये संबंधीत सर्व करांचा उल्लेख करणे आवश्यक.
९. काजु बी ग्रेडींग मशिन कुडाळ, जि.सिंधुदुर्ग ते म.सं.कें. वाकवली, ता.दापोली, जि.रत्नागिरी पर्यंत पोहोच करणेपर्यंतचे वाहतुक खर्च व फिटींग व इतर चार्जेसचा दरपत्रकामध्ये उल्लेख करावा.
१०. कार्यालय कोणतेही कारण न देता आपल्या एकमेव स्वेच्छाधिकारावर हे दरपत्रक रद्द करण्याचे/मागे घेण्याच्या/ दुरूस्ती करण्याचा किंवा नियम तारीख वाढवण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

तरी वरील तपशिलाप्रमाणे काजु बी ग्रेडींग मशिन खरेदी करण्यासाठी व त्याकरीता असणाऱ्या अटी व शर्तीची प्रसिध्दी आपल्या कार्यालयामार्फत विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्दीस देण्यात यावी हि विनंती.

आपला विश्वासू

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली